36

# भारतील दारिद्रय निर्मूलन आणि सरकारी उपाययोजना

डॉ.सौ.शिंदे सुरेखा एस.
(लोकप्रशासन विभागप्रमुख)
कै.डॉ.शंकरराव सातव कला व वाणिज्य
महाविद्यालय ,कळमनुरी

**प्रस्तावना :-**

ब्रिटीशांच्या राजवटीत भारतातून जी प्रचंड संपत्ती इंग्लंड व इतर युरोपियन देशांकडे वाहून गेली, त्यामुळेच भारत दारिद्री झाला व भारतातील ब्रिटीश राजवटीने भारतीय लोकांच्या दारिद्रयाचा प्रश्न निर्माण केला हे उघड सत्य आहे.या संदर्भात भारतीय विचारवंत श्री दादाभाई नौरोजी असे म्हणतात की "ब्रिटीशांमुळे भारताचे केवळ आर्थिक दारिद्रयच वाढले नाही तर नैतिक दारिद्रयही वाढले आहे."[1]

दारिद्रय मानवतेला असलेला शाप आहे. दारिद्रय ही सामाजिक प्रक्रीया आहे .[२] विकसनशिल देशात दारिद्रयाचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येते .अर्थव्यवस्थेतील एक गंभीर समस्या म्हणून दारिद्रयाकडे पाहण्यात येते .स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात दारिद्रयाची तीव्रता अधिकच जानवत आहे दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचा आकडा फुगत जाणे ही चिंतेची आहे.[३] याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय लोक दैववादी आहेत, त्यांचा नशिबावर विश्वास आहे. त्यामुळेच दारिद्रयाचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसून येत आहे . आशा दारिद्रयाच्या अवस्थेत अन्न,वस्त्र व निवारा या किमान गरजांची पूर्तता होऊ शकत नाही ही गंभीर समस्या दुर करण्यासाठी अर्थिक विकासाच्या प्रक्रीयेद्वारा दारिद्रय निर्मुलन करण्याचे अनेक प्रयत्न देशात सुरु झाले आहेत. या प्रयत्नातून राष्ट्रातील सर्व नागरीकांचे उत्पन्न समानता शक्य नसली तरी किमान जीवनस्तर टिकवता येणे . प्रत्येक व्यक्तीला शक्य व्हावे एवढी अपेक्षा तरी पूर्ण व्हावी [४]

**दारिद्रय म्हणजे काय ?**

दारिद्रया संबधी विविध लेखकांनी वेगगेवळे विचार मांडले आहेत.सर्वसाधारणपणे "दारिद्रय म्हणजे मुलभूत गरजा न भागाविता येण्यासारखी परिस्थिती "असा अर्थ काढला जातो. दारिद्रयाच्या अवस्थेत आजारपण कुपोषण ,निरक्षरता, उपासमार अशी लक्षणे दिसतात [५] म्हणून ज्या समाजात अशी लक्षणे आढळतात तो समाज दारिद्री अवस्थेत आहे असे समजण्यास हरकत नाही

**दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या सरकारी उपाययोजना / कार्यक्रम**

अर्थव्यवस्थेतील एक गुंतागुंतीची समस्या म्हणून दारिद्रयाचा उल्लेख करण्यात येतो. लोकसंख्या नियंत्रण कृषिक्षेत्राचा विकास,आर्थिक विषमतेचे निर्मूलन दारिद्रय आणि बेकारी निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी या उपायांद्वारे दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे शक्य असते [६] भारतात गेली ६५ वर्ष ग्रामीण व शहरी भागात असलेले दारिद्रयाचे स्वरुप हे रचनात्मक स्वरुपाचे आहे.स्वातंत्र्यानंतरची पहिली दोन दशके भारताचा आर्थिक विकास अतिशय संथ गतीने झाला. तो सरासरी वार्षिक ० ते ३.५ टक्के इतका होता [७] त्यामुळे या काळात देशातील दारिद्रयाच्या प्रमाणात घट झालीच नाही इ.स.१९७१-७२ पासून केंद्र सरकारने विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्यांना शिक्षण,आरोग्य ,निवारा इत्यादींची उपलब्धता करुन देण्याचा प्रयत्न केला

की,जेणेकरुन त्यांच्या जीवनाच्या दर्जात सुधारणा होऊ शकेल या कार्यक्रमाचे एकुण तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे त्याचे विस्तृत विश्लेषण पुढील प्रमाणे

**A.किमान गरजा पुरविण्याचे कार्यक्रम :-**

या गटांतर्गत अन्नधान्य ,मुलभूत शिक्षण ,आरोग्यसेवा ,स्वच्छ व सुरक्षित पेयजल पुरवठा ,निवास आणि रस्ते या सारख्या सुविधा पुरविण्यासाठी पुढील उपक्रम सुरु करण्यात आले.

१.किमान गरजा कार्यक्रम (MNP)
२.एकात्मीक गरजा बालविकास कार्यक्रम (ICDS)
३.राष्ट्रीय साक्षरता मोहिम (NLM)
४.सार्वत्रिक लसटोचणी कार्यक्रम(UIP)
५. माताबाल विकास कार्यक्रम (MCH) इ.

**B.दारिद्रय निर्मूलनाचे प्रत्यक्ष कार्यक्रम :-**

**(नागरीकांचे उत्पन्न वाढविणारे )**

या गटांमध्ये पुढील कार्यक्रमांचा समावेश होतो.

१.जवाहर ग्रामविकास ( JGSY)
२.सीमांत शेतकरी उन्नती संघटना (MFAL)
३.लघु शेतकरी विकास संस्था (SFDA)
४.एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (JRDP)
५.सुवर्णजयंती ग्रामविकास (SGRY)
६.ग्रामीण भागातील माहिला बालविकास (DWCRA)
७.कुशल कारागिरांना प्रशिक्षण (SITRA)
८.गंगा कल्याण योजना (GKY)
९.पंतप्रधान ग्रामोदय योजना ( PMGY)
१०.शहरी बेकांरासाठी स्वरोजगार (SEPUP)
११.नागरी विकासासाठीचे उपक्रम (UBSP)
१२.शहरी बेकारांसाठी पंतप्रधान योजना (PMIUPEP)
१३.अंत्योदय
१४.ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण (TRYSEM) इ.

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी विशिष्ट समुह घटकांना दारिद्रयरेषेच्या वर आणण्यासाठी त्यांना आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे स्त्रोत निर्माण करण्यासाठी हे उपक्रम राबविण्यात आले. या सर्व कार्यक्रमांतर्गत लाभार्थीना कायमस्वरुपी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करयासाठी बँकानी कमी व्याजदराने कर्ज दिले.तसेच सरकारने त्यांना अनुदान दिले. या चांगल्या योजनांची अंमलबजावणी निटप्रकारे न झाल्याने तसेच भ्रष्टाचार व मिळालेल्या रकमांचा लाभार्थीने केलेला गैरवापर यामुळे या योजना अपेक्षित प्रमाणात यशस्वी होऊ शकल्या नाहीत .पुढे या सर्व योजना'सुवर्णजयंती ग्राम स्वरोजगार'अतंर्गत १९९७-९८ पासून एकत्रित करण्यात आल्या .

तसेच नागरी भागातील दारिद्रय रेषेखालील जनतेचा विकास करण्यासाठी पुढील स्वयंरोजगार कार्यक्रम राबविले शहरी युवकांसाठी जेस SEELYS ,SEPUP,PMIUPEP,UBSP पण या कार्यक्रमामुळे नागरी भागातील दारिद्रयरेषेचे प्रमाण कमी झाले नाही [८]

**C ) दारिद्रय निर्मूलनाचे अप्रत्यक्ष कार्यक्रम :-**

**(रोजगार निर्मितीचे )**

हे कार्यक्रम रोजगार निर्मितीविषयी असून त्यामध्ये पुढील विविध कार्यक्रमांचा समावेश होतो.

१.महात्मा गांधी नरेगा व कामासाठी उन्न कार्यक्रम

२.दशलक्ष विहिर कार्यक्रम

३.राष्ट्रीय भुमिहीन रोजगार हमी योजना (RLEGP)

४.पंतप्रधान रोजगार योजना (PMRY)

५.राष्ट्रीय ग्रामीण रोजगार (MREP)

६.इंदिरा आवास योजना (IAY)

७.आश्वासित रोजगार योजना (EAS)

८.जवाहर रोजगार योजना (JRY)

९.नेहरु रोजगार योजना (NRY)

१०.राष्ट्रीय रोजगार हमी योजना (NREGS) इ.[९]

दारिद्रय निर्मूलनासाठी सुरु करण्यात आलेल्या रोजगार निर्माण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा बेकार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा होता या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कामामुळे समाजासाठी कायमस्वरुपाच्या काही सुविधा निर्माण करण्यात आल्या या कार्यक्रमांचा भूमिहीनांना तसेच शेतमजुरांना मोठया प्रमाणावर लाभ व्हावा हा एक महत्वाचा उद्देश होता.

थोडक्यात वरील विविध प्रकारच्या सरकारी कार्यक्रमातून ग्रामीण भागात रोजगाराची उपलब्धता झाली ग्रामीण जनतेच्या दरडोई दरमाहिना उपभोग खर्चात वाढ झाली आणि त्यामुळे दारिद्रयरेषेखाली

दारिद्रयरेषेखाली जगणाऱ्यांची संख्या कमी होत आहे.तरी परंतु म्हणावे तेवढे यश या कार्यक्रमास प्राप्त होऊ शकले नाही .गेली ६५ वर्ष भारताने नियोजन प्रक्रिया व आर्थिक विकासाद्वारे दारिद्रय निर्मूलनसाठी प्रयत्न केले. विकासाचे जे अनेक कार्यक्रम राबविले गेले त्यामाध्यमातून भारताने अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबन प्राप्त केले.तसेच कॉलरा,देवी ,नारु यासारख्या संसर्गजन्य रोगांवर मात केली .त्या प्रमाणात दारिद्रय निर्मूलनात अपेक्षीत यश आले नाही .वरिल बाबींचा सारासार विचार करुन भविष्य काळात दारिद्रयनिर्मूलन करतांना काही विशिष्ट मुद्दयावर लक्ष देणे महत्वाचे ठरते .जसे

☞दारिद्रय रेषेखालील कुंटुबाचा विकास करण्यासाठी उपलब्ध स्थानिक स्त्रोतांचा पर्याप्त वापर करुन त्यांना विकासाची संधी उपलब्ध करुन देणे.

☞ दारिद्रय रेषेखालील कुंटुबांना योग्य ते प्रशिक्षण देवुन ते एखादा लघू व्यवसाय किंवा उपक्रम सुरु करतील अशा पध्दतीने त्यांना सक्षम बनविणे.

☞त्यांना स्वावलंबनाचे महत्व पटवुन आर्थिक दृष्टया सुरक्षित राहू शकतील अशा संधी उपलब्ध करुन देणे.

☞दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी अनुदान किंवा कमी व्याजाचे कर्ज या ऐवजी बचतीतून उपलब्ध झालेल्या भांडवलाद्वारे विकास घडवून आणणे.

☞आवश्यकतेनुसार विकास कार्यक्रमांची निश्चिती व आयोजन करुन सरकारी यंत्रणेद्वारे अशा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करुन घेणे.

☞बिगर सरकारी संस्थाचे सहकार्य प्राप्त करणे .

☞भ्रष्टाचाराला प्रतिबंध निर्माण करणे.

☞भांडवली गुंतवणूकीला चालना देणे.इ.

राजकीय इच्छाशक्ती आणि सकारात्मक दृष्टीकोणाच्या सहाय्याने वरील शिफारशीवर किंवा उपाययोजनांवर भर दिल्यास संपुर्ण देशातुन दारिद्रय निर्मूलनाची ही प्रक्रिया वेगाने पार पडू शकते .

**संदर्भ सुची**


१.प्रा.ठक्कर के.एच. - भारतीय अर्थशास्त्र
फडके प्रकाशन कोल्हापूर -पृष्ठ क्र-१९

२.डॉ.कोंडेवार यू.बी - भारतीय अर्थव्यवस्था
चिन्मय प्रकाशन औरंगाबाद - पृष्ठ क्र-६४

३.डॉ.सोळुंके आर.एस डॉ.ककडे व्ही.बी - भारतीय अर्थव्यवस्था
श्रीविद्या प्रकाशन पुणे - पृष्ठ क्र .२४५

४.डॉ.कोंडेवार यू.बी - भारतीय अर्थव्यवस्था
चिन्मय प्रकाशन औरंगाबाद - पृष्ठ क्र-६५

५.डॉ.सोळुंके आर.एस डॉ.ककडे व्ही.बी - भारतीय अर्थव्यवस्था
श्रीविद्या प्रकाशन पुणे - पृष्ठ क्र .२४६

६.डॉ.सोळुंके आर.एस डॉ.ककडे व्ही.बी - भारतीय अर्थव्यवस्था
श्रीविद्या प्रकाशन पुणे - पृष्ठ क्र .२५२

७.स्टडी सर्कल रिसर्च फौंडेशन - भारतीय अर्थव्यवस्था
स्टडी सर्कल प्रकाशन मुंबई - पृष्ठ क्र-२९६

८.स्टडी सर्कल रिसर्च फौंडेशन - भारतीय अर्थव्यवस्था
स्टडी सर्कल प्रकाशन मुंबई - पृष्ठ क्र-२९७

९.स्टडी सर्कल रिसर्च फौंडेशन - भारतीय अर्थव्यवस्था
स्टडी सर्कल प्रकाशन मुंबई - पृष्ठ क्र-२९७

# CREATIVE WRITING